# University of Mumbai

**No. Aff./ICC/ (2017-18)/२२/ of 2018**

## परिपत्रक:

विषय:- प्रत्येक तालुक्यात किमान एक अनुदानित महाविद्यालय/ विद्याशाखा यांना अनुदान तत्वावर मंजूरी देण्याबाबत मागविण्यात आलेल्या प्रस्तावांबाबत.

उपरोक्त विषयी उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क. अशाम/२०१७/तालूका एकमेव प्रस्ताव/(२६९/०१) मवि-२ दि. २६ जानेवारी, २०१८ अन्वये अनुसरून आपणांस कळविण्यात येते की; तालुका एकमेव योजने अंतर्गत प्रत्येक तालुक्यात एक महाविद्यालय/ विद्याशाखा अनुदान तत्वावर आणण्यासाठी विद्यापीठ क्षेत्रातील तालुक्याकरिता संचालनामार्फत दिनांक २५.०१.२०१८ रोजी संपुर्ण राज्यातील वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करून इच्छुक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत. सदरची जाहीरात व अर्जाचा नमूना संचालयालयाचे (**www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर संकेतस्थळावरून इच्छुक महाविद्यालयांनी अर्जाचा नमूना डाउनलोड करून घ्यावा व शुल्का रू.१०,०००/- भरावेत (यापूर्वी अर्जासोबत भरले असल्यास पुनश्च भरण्याची आवश्यकता नाही, परंतु शुल्क भरल्याची पावती सोबत जोडावी) व दिनांक २४ फेब्रुवारी, २०१८ पर्यत प्रस्ताव संलग्नता व मान्यता विभाग, रूम नं २०६, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२ येथे सायंकाळी ५.३० पर्यत सादर करावेत. (सदर प्रस्तावांच्या अर्जाचा नमूना सोबत जोडत आहे.)

मुंबई-४०० ०३२
२० फेब्रुवारी, २०१८

कुलसचिवांकरिता

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे (कला वाणिज्य आणि विज्ञान) प्राचार्य

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना:-

१. मा. कुलगुरू यांचे सचिव
२. मा. कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक
३. मा. संचालक (विद्याविनयक नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक
४. मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक

**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्र.आशाम/२०१७/तालुका एकमेव प्रस्ताव/(२६९/०१)मवि-२/1177 दि. २६-१-२०१८

प्रति,

१ कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

२ कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ , नागपूर

३ कुलसचिव,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

४ कुलसचिव,
सोलापूर विद्यापीठ, सोलापुर

५ कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

UNIVERSITY
IS/ICO/EOS/201
06 FEB 2018
30333

विषय : प्रत्येक तालुक्यात किमान एक अनुदानित महाविद्यालय/विद्याशाखा यांना अनुदान तत्वावर मंजूरी देण्याबाबत मागविण्यात आलेल्या प्रस्तावांबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. अनुदा- २०११/(२००/११)/पुनर्बांधणी-६/ मशि-४ दि. २-१२-२०१७
२. शासन शुध्दीपत्रक क्र. अनुदा- २०११/(२००/११)/पुनर्बांधणी-६/ मशि-४ दि. ४-१२-२०१७
३.शासन पत्र क्र. अनुदा- २०११/(२००/११)/मशि-४ दि. २५.०९-२०१७
४.शासन पत्र क्र. अनुदा- २०११/(२००/११)/मशि-४ दि. ०२.०१-२०१८

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, तालुका एकमेव योजने अंतर्गत प्रत्येक तालुक्यात एक महाविद्यालय / विद्याशाखा अनुदान तत्वावर आणण्यासाठी आपल्या विद्यापीठ क्षेत्रातील तालुक्याकरिता संचालनालयामार्फत दिनांक २५-१-२०१८ रोजी संपुर्ण राज्यातील वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन इच्छुक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना संचालनालयाचे www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर संकेतस्थळावरुन अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन घ्यावा व त्याचा वापर अर्ज करणाऱ्या इच्छुकांना माहिती / मार्गदर्शन देण्यासाठी करावा. इच्छुक संस्थाकडून सदरचे अर्ज दि. २४-२-२०१८ पर्यंत विद्यापीठात स्विकृत करावेत. मुदतीनंतरच्या तारखेचे अर्ज स्विकारु नयेत.

आपणाकडे प्राप्त झालेले अर्ज स्वतंत्रपणे शिक्षण संचालनालयाकडे दिनांक २८-२-२०१८ पर्यंत खास दुताकरवी हस्तपोच सादर करण्यात यावेत व या अर्जासोबत खालील प्रपत्रामध्ये यादी देण्यात यावी.

| अक्र | अर्जदार संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | अर्ज केलेल्या विद्याशाखेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

प्राप्त अर्जाची माहिती विहित नमुन्यात DVBW-TTSurekh या फॉन्टमध्ये सीडीसह सादर करण्यात यावी. या योजनेखाली आलेले अर्ज काळजीपूर्वक पाहून या कार्यालयास सादर करावेत.

( डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य पुणे.

## प्रारुप जाहिरात

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

## तालुका एकमेव योजनेतर्गत तालुक्यास वाणिज्य/विज्ञान विद्याशाखेस अनुदान मंजुरीबाबत

प्रत्येक तालुक्यात किमान एक महाविद्यालय/विद्याशाखा (कला, विज्ञान, वाणिज्य) अनुदानावर आणण्याबाबत शासनाने शासन निर्णय दि.४/२/२००८ निर्गमित केला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या निर्देशानुसार नव्याने प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने इच्छुक सर्व संस्थांकडून पुनश्च अर्ज मागविण्यात येत आहे. यापूर्वी खालील तालुक्यासाठी अर्ज केलेल्या संस्थांनी नव्याने अर्ज करणे आवश्यक राहील.

त्या अनुषंगाने खालील तालुक्याच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या विद्याशाखेसाठी संबंधित विद्यापीठांमार्फत प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

प्रपत्र-अ

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | चंद्रपूर | मुल | विज्ञान |
| २ | बुलढाणा | मेहकर | विज्ञान |
| ३ | रायगड | मुरूड जंजिरा | विज्ञान |
| ४ | भंडारा | मोहाडी | विज्ञान |
| ५ | सिंधुदुर्ग | दोडामार्ग | विज्ञान |
| ६ | गडचिरोली | सिरोंचा | वाणिज्य |
| ७ | गडचिरोली | मुलचेरा | वाणिज्य |
| ८ | गडचिरोली | भामरागड | विज्ञान |
| ९ | गडचिरोली | कोरची | विज्ञान, वाणिज्य |
| १० | चंद्रपूर | जिवती | वाणिज्य |
| ११ | सोलापूर | दक्षिण सोलापूर | विज्ञान |
| १२ | नागपूर | पारशिवनी | विज्ञान |
| १३ | नागपूर | भिवापूर | विज्ञान |
| १४ | नागपूर | कुही | वाणिज्य |
| १५ | पालघर | तलासरी | विज्ञान |

प्रपत्र-ब

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | रायगड | म्हसळा | विज्ञान |
| २ | सिंधुदुर्ग | मालवण | विज्ञान |
| ३ | गडचिरोली | भामरागड | वाणिज्य |
| ४ | गडचिरोली | एटापल्ली | वाणिज्य |

**अर्ज सादर करण्याची पध्दती व अंतिम मुदत -**

१. उपरोक्त नमूद ज्या तालुक्यामध्ये एकही वाणिज्य / विज्ञान विद्याशाखा अनुदानावर नाही त्या तालुक्यात किमान एक विद्याशाखेस अनुदान मंजूर करणेसाठी मुंबई विद्यापीठ, मुंबई, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, सोलापूर विद्यापीठ , सोलापूर व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कडे दिनांक २४/२/२०१८

पर्यंत विहित प्रपत्रातील अर्ज इच्छुक संस्थांनी करणे आवश्यक आहे. एका विद्याशाखेच्या अर्जासाठी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांचे नावे रू.१०,०००/- इतके शुल्काचा धनाकर्ष सादर करणे आवश्यक राहील.

२. उपरोक्त नमूद तालुक्यातील विद्याशाखेसाठी यापूर्वी तालुका एकमेव अनुदान योजनेसाठी अर्ज केलेल्या संस्थांनी या जाहिरातीला अनुसरून पुन्हा नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि, याकरिता भरावयाचे शुल्क रू.१०,०००/- यापूर्वीच्या अर्जासोबत भरले असल्यास पुनश्च भरण्याची आवश्यकता नाही, परंतु शुल्क भरल्याची पावती सोबत जोडावी.

३. अर्जासोबत महाविद्यालयात शासन निर्णय दि. १३ / ०९ / २०१७ व दि.१५ / ०९ / २०१७ मध्ये नमूद केलेल्या व उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा उदा.प्रयोगशाळा, कॉमनरूम, लायब्ररी, इत्यादी तसेच महाविद्यालयात कार्यरत असलेले शिक्षक व कर्मचारी यांची माहिती असलेली व्ही.डी.ओ. सी.डी. अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

४. ज्या तालुक्यांसाठी विद्याशाखा प्रसिध्द करण्यात आलेली आहे, त्यासाठी करावयाच्या अर्जाचा विहित नमुना ज्या तालुक्यामध्ये उपरोक्त नमूद विद्याशाखेचे एक ही महाविद्यालय / विद्याशाखा अनुदानित / विना अनुदानित नाही, तथापि कायम विनाअनुदानित आहे, तसेच ज्या तालुक्यामध्ये ज्या विद्याशाखा नाही, अशा तालुक्यात संबंधित विद्याशाखा अनुदानावर आणणेसाठी करावयाच्या अर्जाचा नमूना या शिर्षकाखाली शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ www.dhepune.gov.in निःशुल्क उपलब्ध आहे.

५. अनुदानासाठी इच्छुक सर्व संस्थांनी आपले अर्ज दि.१४/२/२०१८ पर्यंत संबंधित विद्यापीठाकडे सादर करावेत. दि. २४-०२-२०१८ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांच्याकडे व शासनाकडे परस्पर अर्ज सादर करू नये, त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६. तसेच शासनस्तरावरील अनुदान मंजूरीचे आदेश शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होणार असल्याने याप्रकरणी पाठपुरावा करण्याची आवश्यकता नाही, याची नोंद घ्यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

# उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

ज्या तालुक्यामध्ये वाणिज्य व विज्ञान शाखेचे महाविद्यालय/विद्याशाखा अनुदानित/विनाअनुदानित नाही. तथापि कायम विना अनुदानित आहे. तसेच ज्या तालुक्यामध्ये ज्या विद्याशाखा नाही अशा तालुक्यातील एकमेव विद्याशाखा अनुदानावर आणणेसाठी करावयाचा

## अर्जाचा नमुना.

| अ.क्र. | तपशिल | पूर्ततेचा तपशिल<br>थोडक्यात माहिती नमूद करावी व त्या संबंधीची प्राचार्यांनी प्रमाणित केलेले कागदपत्र जोडवीत. | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता | | |
| २ | (दुरध्वनी एस.टी. डी. कोडसह / भ्रमणध्वनी क्रमांक नावासह) | | |
| ३ | महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता | | |
| ४ | अनुदान मंजूर करणेसाठी सुरु असलेल्या कायम विनाअनुदानित विद्याशाखेचे नाव | | |
| ५-अ | नवीन विद्याशाखा सुरू करण्यासाठी परवानगी मिळणेबाबतचा तपशिल, विद्याशाखा, गावाचे नाव, तालुक्याचे नाव, जिल्ह्याचे नाव. | | |
| ५-ब | नवीन विद्याशाखा सुरू करण्यासाठी इमारत उपलब्ध आहे काय, त्याबाबतचा ७/१२ चा उतारा जोडावा व इमारत असल्यास इमारतीचा नकाशा जोडावा. इमारत नसल्यास नवीन विद्याशाखा सुरू करणेस परवानगी मिळाली तर इमारत बांधकाम किती दिवसात केले जाईल याची माहिती हमीपत्राद्वारे द्यावी. | | |
| ६ | ज्या ठिकाणी विद्याशाखा सुरु करावयाची आहे त्या ठिकाणची लोकसंख्या | | |
| ७ | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत संस्था नोंदणी अधिनियम , १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० ( सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) | | |
| ८ | संस्थेच्या नोंदणीस किमान एक वर्ष पूर्ण झाले आहे काय ? ( नोंदणी वर्ष ) | | |
| ९ | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत | | |
| १० | संस्थेचा मागील एक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची साक्षांकित प्रत | | |
| ११ | किमान रु.५,००,०००/- फिक्स डिपॉजिटची अर्ज करणाऱ्या संस्थेची प्रमाणित प्रत | | |
| १२ | चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत | | |
| १३ | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकमध्ये केले जात असल्याचे कागदपत्रे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | संबंधित राष्ट्रीयकृत/शेडयुल बँकेमध्ये ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे आश्वासन पत्र. | | |
| १५ | एक विद्याशाखेसाठी आवेदन शुल्क रुपये-१०,०००/- भरणे आवश्यक आहे. सदरचा धनाकर्ष संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांचे नावे असावा( यापूर्वी अर्ज केलेल्या संस्थांनी शुल्क भरल्याची पावती सोबत जोडावी ). | | |
| १६ | कायम विनाअनुदानित विद्याशाखा/महाविद्यालय शासनाने सुरु करण्यास परवानगी दिलेला आदेश क्रमांक (प्रत सोबत जोडावी) | | |
| १७ | संबंधित महाविद्यालय / संबंधित विद्याशाखा सुरु केलेले शैक्षणिक वर्ष. | | |
| १८ | संबंधित विद्याशाखेत सुरु असलेले आवश्यक विषय व वैकल्पिक विषय खालील तक्त्यात नमूद करावे. | | |

| अ.क्र. | विद्याशाखा | अध्यापनाचे विषय | | पेपर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | आवश्यक विषय | वैकल्पिक विषय | पेपरची संख्या विषय निहाय नमूद करावी | |
| १ | प्रथम वर्ष | | | | |
| २ | व्दितीय वर्ष | | | | |
| ३ | तृतीय वर्ष | | | | |

| | तपशिल | पूर्ततेचा तपशिल<br>थोडक्यात माहिती नमूद करावी व त्या संबंधिची प्राचार्यांनी प्रमाणित केलेले कागदपत्र जोडवेत | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १९ | महाविद्यालय सुरु केल्यापासून विद्यापीठाचे संलग्निकरण मिळालेले आहे काय. संलग्निकरणाच्या प्रती जोडाव्यात. | | |
| २० | अर्जदार संस्थेने प्रस्तावीत केलेली विद्याशाखा, महाविद्यालयाच्या २५ कि. मी. परिसरातील इतर महाविद्यालयात सुरु असल्यास मागील तीन वर्षाच्या त्या विद्याशाखेची वस्तुस्थिती महाविद्यालयाच्या नावासह तपशील द्यावा. | | |
| २१ | प्रस्तावीत विद्याशाखेमुळे उल्लेखित परिसरातील इतर महाविद्यालयाशी अवास्तव स्पर्धा निर्माण होईल काय ? | | |
| २२ | महाविद्यालयास स्वत:ची ईमारत आहे काय?/भाडे तत्वावरील आहे काय. (महाविद्यालयास स्वत:ची इमारत असल्यास त्यासंबंधीचा अधिकार अभिलेखाचा उतारा जोडावा/ इमारत भाडे | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तत्वावरील असल्यास इमारत दुय्यम निबंधक यांचेकडे रजिस्टर्ड केलेल्या भाडेकराराची प्रत जोडावी. तसेच भाडे दिलेले असल्यास त्याच्या पावत्या जोडाव्यात.) | | | | |
| २३ | १. स्वत:ची जागा - अ) "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत. | | | | |
| | ब) "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. | | | | |
| | क) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. | | | | |
| | २. भाड्याची जागा - अ) "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतेलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | | | |
| | ब) "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतेलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | | | |
| | क) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतेलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | | | |
| २४ | "अ" इमारत : (स्वत:ची) - संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे.<br>(शासन निर्णय दि.१३/९/२०१७ व दि.१५/९/२०१७ मधील प्रपत्र-अ व परिशिष्ट ड कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ तपशिल जोडला आहे, (सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे) | | | | |
| | १) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत | शासन निर्णयाप्रमाणे क्षेत्रफळाचे निकष | | अस्तित्वात क्षेत्रफळ | |
| | | वाणिज्य | विज्ञान | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष | २०X२५ | २०X२५ | | |
| | १.२ कार्यालय | ३०X२० | ३०X२० | | |
| | १.३ इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | -- | २०X३० | | |
| | १.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा | -- | ३०X४० | | |
| | १.५ पदार्थविज्ञान प्रयोगशाळा | -- | ३०X४० | | |
| | १.६ जीवशास्त्र प्रयोगशाळा | -- | ३०X४० | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १.७ ग्रंथालय | २०X३० | २०X३० | | |
| | १.८ लेडिज रूम | १०X१५ | १०X१५ | | |
| | १.९ रेकॉर्ड रूम | १०X१५ | १०X१५ | | |
| | १.१० नॅक रूम | १०X१५ | १०X१५ | | |
| | १.११ स्टाफ रूम | २०X३० | २०X३० | | |
| | १.१२ सभागृह | ४०X३० | ४०X३० | | |
| | १.१३ मोठे व्याख्यान कक्ष | ३०X९० | ३०X९० | | |
| | १.१४ टॉयलेट ब्लॉक | २०X३० | २०X३० | | |
| | १.१५ व्हरांडा | २४०० फूट किमान ५ फूट रूंद | ३२०० फूट किमान ५ फूट रूंद | | |
| | १.१६ एन.सी.सी. रूम | २०X१५ | २०X१५ | | |
| | १.१७ एन.एस.एस.रूम | २०X१५ | २०X१५ | | |
| | २) २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती) | | | | |
| | २.२ वीज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | | | |
| | २.३ ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | | | |
| | ३) होस्टेल सुविधा/परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | | | |
| २५ | "ब" इमारत भाड्याची (नोंदणीकृत भाडेकरार) (शासन निर्णय दि.२४/९/२०१७ व दि.१५/९/२०१७ मधील प्रपत्र-अ व परिशिष्ठ ड कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ तपशिल जोडला आहे. (सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे) | | | | |
| | १) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत | शासन निर्णयाप्रमाणे क्षेत्रफळाचे निकष | | अस्तित्वात | |
| | | वाणिज्य | विज्ञान | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष | २०X२५ | २०X२५ | | |
| | १.२ कार्यालय | ३०X२० | ३०X२० | | |
| | १.३ इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | -- | २०X३० | | |
| | १.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा | -- | ३०X४० | | |
| | १.५ पदार्थविज्ञान प्रयोगशाळा | -- | ३०X४० | | |
| | १.६ जीवशास्त्र प्रयोगशाळा | -- | ३०X४० | | |
| | १.७ ग्रंथालय | २०X३० | २०X३० | | |
| | १.८ लेडिज रूम | १०X१५ | १०X१५ | | |
| | १.९ रेकॉर्ड रूम | १०X१५ | १०X१५ | | |
| | १.१० नॅक रूम | १०X१५ | १०X१५ | | |
| | १.११ स्टाफ रूम | २०X३० | २०X३० | | |
| | १.१२ सभागृह | ४०X३० | ४०X३० | | |
| | १.१३ मोठे व्याख्यान कक्ष | ३०X९० | ३०X९० | | |
| | १.१४ टॉयलेट ब्लॉक | २०X३० | २०X३० | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १.१५ व्हरांडा | २४०० फूट किमान ५ फूट रूंद | ३३०० फूट किमान ५ फूट रूंद | | |
| | १.१६ एन.सी.सी. रूम | २०X१५ | २०X१५ | | |
| | १.१७ एन.एस.एस.रूम | २०X१५ | २०X१५ | | |
| | २) २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती) | | | | |
| | २.२ वीज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | | | |
| | २.३ ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | | | |
| | ४) होस्टेल सुविधा/परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | | | |
| | वरील अ व ब मधील (१) व (२) साठी फर्निचर किंवा त्यासाठी किमान रु.५.०० लाख शिल्लक | | | | |
| | ग्रंथालयात पुस्तकाची सुविधा (किमान ५०० पुस्तके प्रत्यक्षात हवी) | | | | |
| २६ | प्रथमतः महाविद्यालय भाड्याच्या इमारतीत सुरू केले जाणार असेल तर प्रथम संलग्नीकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे, त्या ठिकाणी स्वतःचे इमारतीमध्ये स्थलांतरित करत असल्याबाबतचे हमीपत्र | | | | |
| २७ | ग्रंथालयामध्ये अॅक्सेशन रजिस्टरनुसार किती पुस्तके उपलब्ध आहेत त्याची किंमत किती आहे. स्टडी रूम आहे काय, स्टडी रूम मध्ये टिव्ही आहे काय? | | | | |
| २८ | महाविद्यालयात वर्ग खोल्या किती आहेत, त्याचे क्षेत्रफळ निहाय माहिती द्यावी | | | | |
| २९ | महाविद्यालयामध्ये विषयनिहाय प्रयोगशाळा किती आहेत त्याचे क्षेत्रफळ निहाय माहिती द्यावी. (शासन निर्णयातील निकषानुसार) | | | | |
| ३० | प्रयोगशाळेमध्ये कोणत्या सुविधा आहेत ? | | | | |
| ३१ | प्रयोगशाळेतील केमिकल्स व इतर सुविधांची यादी जोडावी, व त्याची किंमत नमूद करावी. | | | | |
| ३२ | महाविद्यालयामध्ये फर्निचर किती आहेत, उदा.कपाटे, खुर्च्या, टेबल, संगणक, फळे इ. | | | | |
| ३३ | महाविद्यालयामध्ये ई-सुविधा उपलब्ध आहे काय ? | | | | |
| ३४ | महाविद्यालयामध्ये इंटरनेटची सुविधा आहे काय ? | | | | |
| ३५ | महाविद्यालयात बोटॅनिकल गार्डन आहे काय ? | | | | |
| ३६ | महाविद्यालयात क्रिडा साहित्य कोणते आहेत ? त्याची यादी किमतीसह देण्यात यावी. | | | | |
| ३७ | महाविद्यालयात मुलांचे व मुलींचे वसतिगृहाची सोय आहे काय ? असल्यास वसतिगृहाची प्रवेश क्षमता किती आहे ? गेल्या तीन वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या देण्यात यावी. | | | | |
| ३८ | महाविद्यालयात मुलांसाठी व मुलींसाठी | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | स्वच्छतागृहे किती आहेत ? पाण्याची पुरेशी सोय आहे का? | | |
| ३९ | महाविद्यालयात पिण्याचे पाण्याची सोय आहे काय ? असल्यास कोणती सुविधा आहे ? पिण्याचे पाणी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आहे का बोअरचे आहे ? | | |
| ४० | महाविद्यालयात विद्यापीठाकडून २f व १२ B दर्जा मिळालेला आहे काय. | | |
| ४१ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९ (६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ज्या संस्थेची यापुर्वीचे महाविद्यालय अस्तित्वात आहे अशा संस्थेने नविन महाविद्यालय / विद्याशाखेची मागणी केल्यास पुर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक / एनबीए मूल्यांकन अथवा पुनर्मुल्यांकन असणे आवश्यक आहे नॅक झाले असल्यास वर्ष व दर्जा, प्रमाणपत्र सादर करावे. | | |
| ४२ | महाविद्यालयास यु.जी.सी व इतर संस्थांकडून पायाभूत सुविधासाठी अनुदान मिळालेले आहे काय, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून Minor Research Project, Major Research Project साठी अनुदान मिळालेले आहे काय. | | |
| ४३ | जाहिरातीनुसार ज्या विद्याशाखेसाठी अर्ज करीत आहात, त्या विद्याशाखेची माहिती विद्याशाखा सुरु झालेल्या शैक्षणिक वर्षापासूनचे आजपर्यंतची विद्यार्थी संख्येची माहिती वर्गनिहाय व वर्षनिहाय नमूद करावी, विद्याशाखेचे वर्ष व मंजूर तुकडयाची माहिती द्यावी. | | |

| अ.क्र. | विद्याशाखा | प्रवेशित विद्यार्थी संख्या | परीक्षेस बसलेले विद्यार्थी संख्या | उत्तीर्ण विद्यार्थी संख्या | | | अनुत्तीर्ण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रथम श्रेणी | द्वि.श्रेणी | तृ.श्रेणी | |
| १ | प्रथम वर्ष | | | | | | |
| २ | द्वितीय वर्ष | | | | | | |
| ३ | तृतीय वर्ष | | | | | | |

टिप- प्रथम वर्षाची प्रत्येक शैक्षणिक वर्षाची विद्यार्थी संख्या विद्यापीठातील Eligibility यादी प्रमाणित करुन द्यावी. व द्वितीय, तृतीय वर्षाची प्रवेशित व परिक्षेला बसलेल्या विद्यार्थी संख्येची विद्यापीठातील परीक्षा विभागाची प्रमाणित केलेली यादी सादर करावी.

| अ.क्र. | विद्याशाखा | मंजूर तुकडया | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष | | |
| २ | द्वितीय वर्ष | | |
| ३ | तृतीय वर्ष | | |

| अ.क्र. | तपशिल | पूर्ततेचा तपशिल<br>थोडक्यात माहिती नमूद करावी व त्या संबंधिची प्राचार्यांनी प्रमाणित केलेले कागदपत्र जोडवेत | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ४४ | प्रस्तावीत विद्याशाखेच्या प्रथम वर्ष प्रवेशेच्छूक विद्यार्थ्यांची अंदाजीत संख्या | | |
| ४५ | महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहिती खालील प्रपत्रात अर्जासोबत जोडावी. प्रस्तुत महाविद्यालयात प्राचार्यांचे पद नियमित भरलेले आहे काय, असल्यास कधीपासून भरलेले आहे. त्यास विद्यापीठाची मान्यता घेतलेली आहे काय? मान्यतेच्या प्रती जोडाव्यात. | | |

शिक्षक कर्मचारी

| अ. क्र. | अधिव्याख्यात्यांचे नांव | जन्म दिनांक | प्रवर्ग | निवड विद्यापीठ समितीमार्फत/ स्थानिक निवड समितीमार्फत झालेली आहे याबाबतची माहिती. | शैक्षणिक अर्हता पदव्युत्तर श्रेणी, टक्केवारी. पीएच.डी. एम.फिल. नेट/सेट | वेतन श्रेणी | नेमणूकीचा दिनांक | पुर्णवेळ आहे काय | नेमणूकीस विद्यापीठा कडून मान्यता मिळालेला क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहिती खालील विवरणपत्रात द्यावी.

| अ.क्र. | शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | जन्म दिनांक | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

वयोधिक्य असलेले कर्मचारी असल्यास त्याची जबाबदारी संस्था चालकावर राहील. आरक्षण नियमाचे अनुपालन केलेले असणे आवश्यक आहे. ( रोस्टरची साक्षांकित प्रत सादर करावी. )

| | तपशिल | पूर्ततेचा तपशिल<br>थोडक्यात माहिती नमूद करावी व त्या संबंधिची प्राचार्यांनी प्रमाणित केलेले कागदपत्र जोडवेत | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ४६ | महाविद्यालय सुरु केल्यापासून प्रत्येक वर्षी वेतन व वेतनेत्तर अनुदानाचे लेखापरीक्षण सनदी लेखापालाकडून करुन घेतलेले आहे काय, असल्यास खालील प्रपत्रात वर्षनिहाय माहिती देण्यात यावी. तसेच ऑडिटेड स्टेटमेंटच्या गोषवाऱ्याची प्रत जोडावी. | | |

| अ.क्र. | आर्थिक वर्षे | वेतनावरील खर्च | वेतनेतर वरील खर्च |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

| | तपशिल | पूर्ततेचा तपशिल थोडक्यात माहिती नमूद करावी व त्या संबंधिची प्राचार्यांनी प्रमाणित केलेले कागदपत्र जोडवेत | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ४७ | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन महाविद्यालय सुरु झाल्यापासून बँकेमार्फत केले जात आहे काय. कोणत्या बँकेमार्फत केले जात आहे, त्या बँकेचे नाव शाखा नमूद करावे. | | |
| ४८ | अर्जदार संस्थेची इतर किती महाविद्यालये आहेत, ती अनुदानित किंवा कायम विना अनुदानित आहेत काय, त्याची माहिती द्यावी. | | |
| ४९-अ) | अर्जदार संस्थेच्या या महाविद्यालयात इतर कोणत्या विद्याशाखा अनुदानावर आहेत, त्या विद्याशाखेस शासन परवानगी आदेश व विद्याशाखा सुरु केलेले वर्ष, या विद्याशाखेसाठी गेल्या ५ वर्षाची विद्यार्थी संख्या व कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यादी शिक्षण सहसंचालक यांनी शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी संख्या मान्यता दिलेल्या कार्यभाराची प्रत द्यावी. | | |
| ४९- ब | किती अनुदानित, विना अनुदानित , कायम विनाअनुदानित महाविद्यालये/विद्याशाखा आहेत. | | |
| ५० | संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची यादी पत्त्यासह जोडावी.( दुरध्वनी क्रमांक, एसटीडी कोडसह, भ्रमणध्वनी इमेल आयडी इ.)<br>संस्थेच्या कार्यालयाचा पुर्ण पत्ता नमूद करावा. नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, ई-मेल इ. | | |
| ५१ | प्रस्तुत तालुक्यात किती महाविद्यालये आहेत व या महाविद्यालयामध्ये कोण-कोणत्या विद्याशाखा अनुदानित अथवा कायम विना अनुदानित आहेत. | | |

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | विद्याशाखा | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

| | तपशिल | पूर्ततेचा तपशिल थोडक्यात माहिती नमूद करावी व त्या संबंधिची प्राचार्यांनी प्रमाणित केलेले कागदपत्र जोडवेत | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ५२ | वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा ज्या महाविद्यालयात सुरु करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी च्या परिक्षेचे केंद्र आहे काय ? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५३ | ज्या तालुक्यात विद्याशाखा मंजुरीसाठी अर्ज करीत आहात, त्या तालुक्यात इयत्ता १२ वी पर्यंतचे किती कनिष्ठ महाविद्यालय सुरू आहेत, त्या कनिष्ठ महाविद्यालयात सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात विद्याशाखानिहाय किती विद्यार्थी प्रवेशित आहेत, तसेच सन २०१६-१७ मध्ये किती विद्यार्थी उत्तीर्ण आहेत याचा तपशिल खालील तक्त्यात देण्यात यावा. | | |

| अ. क्र. | कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखेचे नाव | प्रवेशित विद्यार्थी इयत्ता १२ वी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी इयत्ता १२ वी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

वरील प्रपत्रात एच.एस.सी. बोर्डाकडील अचूक माहिती द्यावी.

| | तपशिल | पूर्ततेचा तपशिल थोडक्यात माहिती नमूद करावी व त्या संबंधीची प्राचार्यांनी प्रमाणित केलेले कागदपत्रे जोडावेत . | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ५४ | प्रस्तुत महाविद्यालयाने शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी केलेली उल्लेखनीय कामगिरीची माहिती संक्षिप्त स्वरूपात द्यावी. | | |
| ५५ | या अर्जान्वये नवीन विद्याशाखा सुरू करणेस परवानगी मिळणेसाठी मागणी केलेल्या विद्याशाखेत इमारत, फर्निचर, ग्रंथालय, प्रयोगशाळा व पायाभूत सुविधा उभारण्यासाठी संस्थेकडे किती रकमेचा निधी बँकेत डिपॉझिट केलेला आहे, त्यासंबंधीचा पुरावा देण्यात यावा. | | |
| ५६ | महाविद्यालय भाड्याच्या इमारतीत सुरू केले असेल तर प्रथम संलग्नीकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे त्या ठिकाणी स्वतःचे इमारतीमध्ये स्थलांतरित करत असल्याचे हमीपत्र. | | |
| ५७ | मागणी केलेली विद्याशाखा सुरू करणेसाठी संस्थेने केलेल्या ठरावाची प्रत व दिनांक. | | |

वरील माहिती व्ही.डी.ओ. सी.डी. मध्ये अर्जासोबत सादर करावी. व्ही.डी.ओ. सी.डी. ची पाहणी शासनाने गठीत केलेल्या तज्ञांच्या गटाकडून केली जाणार आहे.

(अध्यक्ष यांची नावासह स्वाक्षरी)
संस्थेचे पूर्ण नाव व पत्ता
शिक्क्यासह

( सचिव यांची नावासह स्वाक्षरी)
संस्थेचे पूर्ण नाव व पत्ता
शिक्क्यासह